स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक 12–09–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 14. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 15. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 16. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 143:— महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास {लोककर्म झोन 3} योजने अंतर्गत प्रभाग क्र. ६२ येथील धनगवळी नगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. पी. के. नगरारे कंन्स्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३९,९९,७२३/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 144:— महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास {लोककर्म झोन 3} योजने अंतर्गत प्रभाग क्र. ६२ येथील विठठल नगर १ ते राधाकृष्ण नगर, पिपळा रोड पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. पी. के. नगरारे कंन्स्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४९,८३,८५६/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 145ः– {वित्त विभाग} नागपूर महानगरपालिकेत GST यंत्रणा योग्य रित्या राबविण्यासाठी व यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी तसे मनुष्यबळ उपलब्ध ते सहीत यंत्रणा नियुक्त करण्यासाठी निविदा बोलविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा तसेच,

भारत सरकारने संपूर्ण देशात दिनांक 1 जूलै, 2017 पासून वस्तू व सेवाकर ( Goods and Service Tax ) ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर वस्तू व सेवाकराची अंमलबजावणी योग्य रितीने महानगरपालिकेत करण्यासाठी मोठया प्रमाणावर तज्ञ मनुष्यबळ, सॉफ्टवेअर इत्यादी उपलब्ध ते सहित यंत्रणा नियुक्त करणे आवश्यक आहे.

हया सर्व बाबींसाठी अपेक्षित खर्च रू. 2.00 कोटी चे आसपास आहे. करीता वर नमूद केल्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेत GST यंत्रणा योग्यरित्या राबविण्यासाठी व यंत्रणेच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी यंत्रणा नियुक्त करण्यासाठी निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 146ः– {स्थावर विभाग} मौजा–बिनाकी, खसरा क्र. 56 ते 60, वैशाली नगर येथील नागपूर सुधार प्रन्यासच्या 4886.00 चौ.मी भुखंडावर बांधण्यात आलेल्या जलतरण तलाव व क्रिडा संकुलनाचे बांधकाम जागेसह नागपूर सुधार प्रन्यासकडुन महानगरपालिकेला हस्तांतरीत करुन देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त जलतरण तलाव व क्रीडा संकुल चालविण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध धोरण तयार करावे व उत्पन्नाची बाजू तपासुन योग्य प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठवावा या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 147ः– {लोककर्म झोन 3} प्रभाग क्र. ३१ अंतर्गत संघ बिल्डींग, रेशिमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृति मंदिर परिसरात कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. ४८,३६,०५४/– (अक्षरी अठठेचाळीस लक्ष, छत्तीस हजार, चौपन फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्येता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्य, सर्वश्री. मनोज सांगोळे, हरिष ग्वालबन्सी, जितेंद्र घोडेस्वार यांनी विरोध दर्शविला.)

ठराव क्रमांक 148ः– {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ३१ अंतर्गत संघ बिल्डींग, रेशिमबाग येथिल डॉ. हेडगेवार स्मृति मंदिर परिसरात सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. ८९,०२,७९०/– (अक्षरी एकोननव्वद लक्ष, दोन हजार, सातशे नव्वद फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्येता करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्य, सर्वश्री. मनोज सांगोळे, हरिष ग्वालबन्सी, जितेंद्र घोडेस्वार यांनी विरोध दर्शविला.)

ठराव क्रमांक 149ः– {पिंच प्रकल्प} नागपूर महानगरपालिकेतर्फे बांधा वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर मनपाच्या जागेवर व्यापारी संकुल बांधण्याच्या कामाचे कंत्राट पुढीलप्रमाणे करण्यात आले होते.

१. नेताजी मार्केट, सिताबर्डी चा करारनामा M/s S.B. Shopping Mall & Hotel Pvt. Ltd. (SPV), यांचेसोबत दिनांक 27.07.2007 ला करण्यात आला होता.
२. जलप्रदाय कार्यालय, बर्डी चा करारनामा M/s S.B. Concept Hotel Malls Pvt. Ltd. (SPV), यांचेसोबत दिनांक 26.07.2007 ला करण्यात आला होता.
३. गोकुलपेठ मार्केट चा करारनामा M/s G.P. Concept Hotel & Malls Pvt. Ltd. (SPV), यांचेसोबत दिनांक 20.08.2008 ला करण्यात आला होता.
४. पाचपावली मार्केट चा करारनामा M/s P.P. Shoppers Mall & Hotel Pvt. Ltd. (SPV), यांचेसोबत दिनांक 28.11.2007 ला करण्यात आला होता.

उपरोक्त १, ३ व ४ येथील बाजारातील अस्तित्वात असलेल्या दुकानदारांना बाजार विभागाने नोटीसेस दिल्यानंतरही जागा रिकामी न झाल्यामुळे जागेचे हस्तांतरण कंत्राटदारास करता आले नाही.

अनुक्रमांक २ वरील जागा कंत्राटदारास हस्तांतरीत केली होती परंतु सद्या मेट्रो रेल च्या Alignment मधे येत आहे.

याबाबत कंत्राटदाराशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रति, मुख्य अभियंता यांच्या दि. १७.०६.१७ बैठकीचे इतिवृत्त, तसेच कायद्याचे सल्लागार यांच्या प्राप्त अभिमताच्या अनुषंगाने करारनाम्यातील अटीप्रमाणे जर का मनपाद्वारे जागा उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही तर करारनाम्यातील अट क्र. 10 (a) (i) प्रमाणे कंत्राटदाराने मनपाकडे जमा केलेल्या one time premium तथा अमानत रक्कम ही बिनव्याजी परत करणे बंधनकारक आहे.

कायद्याचे सल्लागार यांची अभिमतातील मुख्यबाबी खालील प्रमाणे आहे.

"It is seen from Clause F of the agreement at Page No 5 that the onetime premium was non refundable but subject to certain other conditions. It is also seen from Clause 10 (a) (i) of the agreement that in case NMC was unable to handover the vacant possession of the project site due to any compulsion beyond the control of NMC, within a period of six months from the effective date, then at the option of the Entrepreneur, NMC was required to extend the time of completion of the construction for the amount of time that the delay subsisted or the NMC was required to refund the first premium paid by the Entrepreneur without interest.

It appears that the Entrepreneur had met the Municipal Commissioner on 12.07.2017 regarding the above said shopping malls, which could not be started for various reasons. In the said meeting the Entrepreneur submitted to the Municipal Commissioner that as NMC had not handed over the vacant possession of the project site within the stipulated period he was entitled for refund of the onetime premium as well as the EMD amount deposited by him at the time of signing the above said four agreements.

I have carefully considered the various provisions of the agreements signed by NMC with respective SPV. Clause 10 (a) (i) of the agreement is very specific in as much as it states that the Entrepreneur is entitled to receive his onetime premium without interest. Moreover, since the project has not started the Entrepreneur will be entitled to receive the EMD amount that was converted as performance security since the projects had not commenced at all.

Hence in my opinion the Entrepreneur will be entitled to receive the one time premium deposited by him for each of the project as well as EMD amount but without any interest after the above said 4 agreements are terminated/foreclosed".

करीता, याबाबत खालील कार्यवाही करण्याचा प्रश्न विचारात घेऊन

- कंत्राटदाराने जमा केलेले अमानत रक्कम रु. ५०.०० लक्ष प्रति प्रकल्पाप्रमाणे रु. २.०० कोटी बिन व्याजी परत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- कंत्राटदाराने जमा केलेले one time premium (१) नेताजी मार्केट, सिताबर्डी करीता रु. २.०० कोटी, (२) जलप्रदाय कार्यालय, बर्डी करीता रु. १.५० कोटी, (३) गोकुलपेठ मार्केट करीता रु. २.०० कोटी व (४) पाचपावली मार्केट करीता रु. २.५० कोटी अशी एकूण रु. ८.०० कोटी बिनव्याजी परत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
- हा करार संपुष्टात आणून कंत्राटदाराला कंत्राटापासून मुक्त करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 150:– हनुमाननगर झोन क्र. ०३ अंतर्गत ठराव क्र. ०५, दिनांक {हनुमाननगर झोन 03} १८/०८/२०१७ अन्वये प्रभागनिहाय व पदनिहाय सन २०१७–१८ चे प्रभाग समितीचे अंदाजपत्रकास सोबतच्या यादीनुसार प्रभाग समिती ठराव ०५, दिनांक १८/०८/२०१७ चे अंदाजपत्रकास (परिशिष्ट ''अ'') द्वारे प्रभाग समितीने मंजुरी प्रदान केली.

सबब या प्रभाग समितीचा अंदाजपत्रक २०१७–१८ (परिशिष्ट ''अ'') स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 151ः— पृष्ठ कं. १० वरील मा. आयुक्त यांचे दिनांक
{आरोग्य विभाग} २४/०८/२०१७ च्या आदेशान्वये नियमानुसार E-Tender प्रक्रिया करणेबाबत संबोधिले आहे.

सदर Bins खरेदी बाबत केंन्द्र शासनाचे सयुंक्त सचिव एव मिशन निर्देशक दि. २१/०३/२०१७ च्या पत्रान्वये Gem पोर्टल द्वारे खरेदी करण्याचे निर्देश प्राप्त आहे. तसेच सर्वसाधारण सभेचा ठराव कं. २६ दिनांक ०८/०५/२०१७ आणि स्थायी समिती ठराव कं. ९७ दिनांक ०७/०७/२०१७ अन्वये अंदाजे १३.५०कोटीच्या Bins खरेदीस मान्यता प्राप्त आहे.

ज्ञापन कं. ९ व १० वर मा. प्र.ले.वि.अ यांनी Gem/DGS&D Online Portal हया द्वारा खरेदी करण्याचे कुठलेही निर्देश राज्य शासनाने घेतले नाहीत त्यामुळे शासन निर्णय नुसार खरेदी करण्यास तरतुदी मनपा ला बंधनकारक आहे असे मत व्यक्त केले आहे. परंतु विभागाने शासन निर्णय कंमाक संकीर्ण २०१६/प्र.क्र.२१५/उद्योग ४ मधील कं. ५ नुसार Bins खरेदी सदर पोर्टलवरील Gem पोर्टलवर स्पर्धात्मक ऑनलाईन निविदा द्वारे रिव्हर्स ऑक्शन पध्दतिने करण्यात आलेली निविदा प्रकीया रद्द् करणे अभिप्रेत आहे.

सदर प्रक्रियेत प्राप्त Product चे Specification नुसार फक्त एकच Bidder पात्र असुन उर्वरित ११ Bidder यांनी आवश्यक Specification सादर न केल्याने अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

१) यापुर्वी विभागाद्वारे करण्यात आलेली Gem Portal निविदा प्रर्कीया रद्द् करणे, तसेच पृष्ठ कं. ९ व १० वरील मा. प्र.ले.वि.अ यांनी नमुद केलेल्या निकशाद्वारे रु. १३.५० कोटीची Bins खरेदी विभागाचे स्तरावर Bins चे Specification निश्चीत करुन ई—निविदे द्वारे (E-Tender) चा अवलंब करुन खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर करण्याचे मार्गदर्शन तथा मान्यतेस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन ई—निविदा द्वारे लघुनिविदा काढाव्या यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 152ः— हॅड्रन्ट दुरूस्ती व नविन हॅड्रन्ट उभारणे कार्याकरीता पद
{अग्निशमन विभाग} क्र.A42600371034 या मधून रू. 110 लक्ष राशी पूर्नविनियोजनाद्वारे पद क्र. 57/A22600332023 यामध्ये वळती करून घेणेबाबत.

नविन 24X7 योजनेअंतर्गत नविन जलवाहिन्या टाकल्याने अस्तित्वात असलेले नळखांब (हॅड्रन्ट) या जलवाहिन्यांना जोडले नसल्याने बंद पडलेले आहेत. त्याचप्रमाणे नळखांबाजवळून गेलेल्या रस्त्यांची उंची वाढल्याने नळखांब जमिनीखाली दबले आहेत. नागपूर शहराचा मोठया प्रमाणात विस्तार झाल्याने नविन वस्त्या अस्तित्वात आल्या आहेत. काही ग्रामीण भाग म.न.पा. मध्ये समाविष्ट झाले असून या भागात सुद्धा 24X7 उच्च दाबाच्या जलवाहिनीवर नळखांब (हॅड्रन्ट) व्यवस्था असणे आवश्यक आहे.

तसेच शहरामध्ये मॉल्स, स्लम एरीया, गर्दीच्या बाजारपेठा, हॉस्पीटल, पेट्रोल पंप, स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, गगनचुंबी इमारती अस्तित्वात आल्या असून अशा परीसरात अग्नि दुर्घटना संभावनांचे प्रमाण जास्त असते. या ठिकाणीसुद्धा मुख्य जलवाहिन्यांवर नळखांब (हॅड्रन्ट) लावणे आवश्यक आहे.

याकरीता विभागाने 116 फायर हॅड्रन्ट चिन्हित केले. ज्यामध्ये 9 हॅड्रन्ट सुरू असून 10 फायर हॅड्रन्ट नादुरूस्त व 97 फायर हॅड्रन्ट नविन उभारणे कार्याकरीता जलप्रदाय विभागाला प्रस्तावित करण्यात आले होते.

जलप्रदाय विभागाने दुरूस्ती कार्याकरीता रू. 20,683 व नविन हॅड्रन्ट उभारण्याकरीता रू. 1,06,619 याप्रमाणे अंदाजे खर्च येईल असे प्राकलन तयार केले असून 10 फायर हॅड्रन्ट दुरूस्ती कार्यावर रू. 2,06,830 व 97 नविन फायर हॅड्रन्ट उभारण्यास रू.

1,03,42,043 असे एकुण रू. 1,05,48,873 हॅड्रन्ट दुरूस्ती व नविन हॅड्रन्ट उभारण्याकरीता याप्रमाणे अपेक्षित खर्च येणार आहे.

विभागाने हॅड्रन्ट दुरूस्ती व नविन हॅड्रन्ट उभारण्याचे कार्याकरीता पद क्र 57/A22600332023 सुस्थिती व दुरूस्ती या पदशिर्षकाअंतर्गत सन 2017–18 या आर्थिक वर्षात रू. 125 लक्षाची मागणी केली होती. परंतु विभागाला ही राशी प्राप्त झाली नसल्याने विभागाचा महत्वाकांक्षी प्रकल्पाचे कार्य करण्यास आर्थिक अडचण निर्माण झाली आहे.

करीता उपरोक्त कार्याची निकडता लक्षात घेता पद क्र. 571/A42600371034 या पदातून रू. 110 लक्ष राशी पूर्नविनियोजनाद्वारे पद क्र. 57/A22600332023 यामध्ये वळती करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच, पुनर्विनियोजन प्रस्ताव अंतिम मंजुरीकरिता म.न.पा. महासभेच्या मंजुरीकरिता पाठविण्यास एकमताने शिफारस करण्यात येते.

ठराव क्रमांक 153 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर